।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४१ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४२ वे नवीन वर्ष २१ वे | रविवार दि.१ डिसेंबर २०२४ पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ४५ वा

## स्थानिक स्वराज्य संस्थेवर धनुष्यबाणाचा भगवा फडकवण्याचा शहाजीबापू पाटील यांचा निर्धार



सांगोला : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माझे व शिवसैनिकांचे अतूट नाते आहे. २०२४ विधानसभा निवडणुकीत प्रत्येकाने आपण काय योगदान दिले याचे आत्मचिंतन केले पाहिजे. ही निवडणूक सर्व व्यापक भावनेवर गेली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,मा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, नाम. गुलाबराव पाटील यांनी सांगोला तालुक्याच्या विकासासाठी भर भरून निधीचे मोठे योगदान दिले. उबाठाचे उमेदवार दीपकआबा म्हणतात बापूंनी मला पाठिंबा द्यायला हवा होता. मी दीपकआबांना लहान भाऊ मानून आमदारकीचे ५०% अधिकार दिले हे शिवसैनिकांना दिले असते तर माझा पराभव झाला नसता. या निवडणुकीत मतदार बंधू-भगिनींनी ९१ हजार मते देऊन त्यांची जबाबदारी पूर्ण केली हे काही कमी नसुन मतदारांचे आभार व्यक्त केले. तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेवर शिवधनुष्याचा भगवा फडकवण्याचा निर्णय घेण्यात आला. मला येत्या दोन महिन्यात मोठे पद मिळेल, असा आत्मविश्वास मा आमदार शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केला.

महायुतीचे अधिकृत उमेदवार मा.आम शहाजीबापू पाटील यांच्या पराभवानंतर चिकमहुद येथे बुधवार दि.२७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता मतदारसंघातील शिवसेना कार्यकर्त्यांची विचारविनिमय बैठक संपन्न झाली .यावेळी मा. आमदार शहाजीबापू पाटील हे बोलत होते. या बैठकीसाठी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मतदार बांधव, युवा वर्ग उपस्थित होते .

पुढे बोलताना शहाजीबापू पाटील म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सांगोला तालुक्यावर व माझ्यावरती खूप मोठे प्रेम व उपकार आहेत.अडीच वर्षात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून सांगोला विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी तब्बल ५ हजार ५०० कोटी रुपये विकास निधी मिळाला. या निवडणुकीत माझा पराभव झाला असला तरी कार्यकर्त्यांनी पराभवामुळे खचून जावू नये व नाराजी होऊ नये. आपण सर्वांनी मोठ्या जिद्दीने, धाडसाने व उमेदीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकवल्याशिवाय स्वस्त बसायचे नाही असा निर्धार व्यक्त केला. कार्यकर्त्यांनी आजपासूनच कामाला लागावे .यापुढे सर्वांनी एक दिलाने काम करावे. तालुक्याच्या विकासासाठी निर्णयाची जबाबदारी व राजकारणाची जबाबदारी कार्यकर्त्यांनी माझ्यावर सोपवली असून मी दिलेल्या शब्द कार्यकर्ते पाळणार आहेत. ९१ हजार मतदारांनी मतदान करून मोठी शिदोरी माझ्या हाती सोपवली आहे.अखेरच्या श्वासापर्यंत तालुक्यातील जनतेच्या विश्वास पात्र राहून एकही काम आडू देणार नाही. कोणी अडवणूक करण्याचा प्रयत्न केल्यास ते खपवून घेतले जाणार नाही. राज्यात महायुतीचे सरकार आहे. मी खंबीरपणे जनतेच्या पाठीशी उभा आहे. महायुतीचे सरकार महाराष्ट्र वैभवशाली करण्यासाठी प्रयत्नशील आहे . माझा पराभव झाला म्हणून या सुडाचे राजकारण करणार नाही. यापुढेही सांगोला तालुक्याच्या विकासासाठी मोठे योगदान देण्यास सदैव तत्पर आहे अशी ग्वाही शहाजीबापू पाटील यांनी दिली.

पान नं.३ वर...

# राष्ट्रवादी पुन्हा..

## दिपकआबाप्रेमी कार्यकर्त्यांचा दिपकआबांना आग्रह





सांगोला : सांगोला विधानसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी पुन्हा स्वगृही म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये परत जावे यासाठी आता दिपकआबाप्रेमी कार्यकर्त्यांनी आग्रह धरला आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार असूनही महाविकास आघाडी मधील घटक पक्षांनी आपली फसवणूक केली त्यामुळेच विधानसभा निवडणुकीत आपला पराभव झाला त्यामुळे आपण आता महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात न थांबता राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पुन्हा सक्रिय व्हावे अशी आग्रही मागणी डॉ राज मिसाळ यांनी केली आहे.

पराभवाचे चिंतन करण्यासाठी नुकत्याच सांगोला येथे आयोजित केलेल्या बैठकीत सांगोला विधानसभा मतदारसंघातील हजारो कार्यकर्त्यांनी दिपक आबा साळुंखे पाटील यांनी पुन्हा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून सक्रिय व्हावे असा आग्रह केला. बैठकीत ज्येष्ठ नेते तानाजीकाका पाटील, आर डी पवार, पियुष साळुंखे, शिवाजी बनकर, शिवाजी कोळेकर, राज मिसाळ, संभाजी हरिहर, अजित देवकते, नितीन रणदिवे, विजय झंवले, भारत नागणे, रफिक काझी, प्रा अनिल नवत्रे आदींसह प्रमुख कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना माजी आमदार दिपकआबा साळुंखे यांनी आपल्याला फसवणाऱ्या महाविकास आघाडीतून बाहेर पडावे असा आग्रह धरला.

या चिंतन बैठकीत दिपकआबांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आणि भूमिकेचा आदर करूनच पुढील राजकीय भूमिका ठरविणार असल्याचे सांगितल्याने दिपकआबा पुन्हा स्वगृह परतणार असल्याचे या बैठकीतून संकेत मिळाले आहेत.

## सांगोला तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी नवीन सहा रुग्णवाहिका मिळाल्या

### माजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या मागणीला यश



सांगोला – सांगोला तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी नव्याने मिळालेल्या सहा रुग्णवाहिकेचे पूजन शिवसेनेचे माजी आमदार शहाजी बापू पाटील यांच्या हस्ते पुष्पहार घालून श्रीफळ फोडून केले.यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अविनाश खांडेकर , वैद्यकीय अधिकारी डॉ कल्याण ढाळे, संजय मेटकरी , आरोग्य सहाय्यक जिलानी काझी , आरोग्य कर्मचारी तसेच रुग्णवाहिकेचे सर्व चालक उपस्थित होते.

सांगोला तालुक्यातील सहा प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिकेना १० वर्षे पूर्ण झाल्यामुळे शासनाच्या नियमाप्रमाणे त्या आरोग्य विभागाकडे जमा होणार आहेत. सांगोला तालुक्याचे क्षेत्रफळ मोठे असल्याने गावे वाड्यावस्त्या चौहो बाजूंनी विखुरलेली आहेत. त्यामुळे त्या गावातील रुग्णांना वेळेत रुग्णसेवा मिळावी, वैद्यकीय उपचार मिळण्यास विलंब लागू नये या दृष्टीने नव्याने सर्व सोयी सुविधा अशा रुग्णवाहिका मिळाव्यात म्हणून आमदार शहाजी बापू पाटील यांनी दीड वर्षांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व तत्कालीन आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली होती.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी शासनस्तरावरून नवीन सहा रुग्णवाहिका उपलब्ध झाल्या होत्या परंतु आचारसंहितेमुळे त्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ताब्यात दिल्या नव्हत्या काल शनिवारी सांगोला पंचायत समितीच्या आवारात आमदार शहाजी बापू पाटील यांच्या हस्ते नवीन रुग्णवाहिकेचे पूजन करून त्या त्या प्राथमिक आरोग्य केंद्राकडे सुपूर्द केल्या आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांना नव्याने रुग्णवाहिका उपलब्ध झाल्यामुळे वैद्यकीय अधिकारी सह ग्रामस्थांमधून आनंद व्यक्त होत आहे.

## दुचाकी व मालट्रकच्या झालेल्या अपघातामध्ये शालेय विद्यार्थ्यांचा मृत्यू



सांगोला :दुचाकी व मालट्रकच्या झालेल्या अपघातामध्ये दुचाकी वरील १७ वर्षीय शालेय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना शनिवार दिनांक ३० रोजी सांगोला पंढरपूर रोड जवळील बायपास जवळ घडली आहे. अमर दिघे, असे अपघातामध्ये मृत्यू झालेल्या शालेय विद्यार्थ्यांचे नाव आहे.

याबाब मिळालेली अधिक माहिती अशी की, अमर दिघे हा विद्यार्थी सांगोल्या वरून घराकडे जाण्यासाठी निघाला असता सांगोला पंढरपूर रोड जवळील बायपास वरून वाढेगाव येथील त्याच्या घराकडे निघाला होता. बायपास जवळ मालट्रक ची दुचाकीला धडक झाली आणि हा अपघात घडला असल्याचे गावातील नागरिक सांगत आहेत. यामध्ये अपघातानंतर बंडू दिघे यांनी १०८ ॲम्बुलन्स ने उपचाराकरिता सांगोला ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता, तेथील डॉक्टरांनी उपचारापूर्वीच तो मयत झाला असल्याचे सांगितले.

याबाबत डॉ. उत्तम फुले यांनी खबर दिली असून त्यानुसार सांगोला पोलिसात नोंद करण्यात आली आहे. पुढील घटनेचा तपास पो.बनसोडे करीत आहेत.

# संपादकीय......

जुने वर्ष-४२ वे
अंक-४ था

## आयुर्वेदाच्या आधुनिकीकरणाची आव्हाने

द गॅझेट ऑफ इंडिया मधील अलीकडील अधिसूचना: एक्सट्राऑर्डिनरीने आयुर्वेदातील डॉक्टरेट ऑफ मेडिसिन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी भारतीय औषध प्रणालीच्या राष्ट्रीय आयोगाच्या पुढाकाराला औपचारिक रूप दिले आहे. मानसोपचार, हेपॅटोलॉजी, ऑन्कोलॉजी, ऑर्थोपेडिक्स, प्रजनन औषध आणि जेरोन्टोलॉजी या सहा विषयांसाठी डीएम अभ्यासक्रम सुरू केले जातील. ते संबंधित विशेष क्षेत्रातील समकालीन विज्ञानातील अद्ययावत ज्ञानासह आयुर्वेद क्लासिक्समध्ये सखोल ज्ञान असलेले सुपर विशेषज्ञ तयार करण्याच्या उद्देशाने आहेत. ही पायरी अस्पष्ट दिसते कारण आयुर्वेदासारख्या पारंपारिक वैद्यकीय प्रणाली विशेष आणि सुपर स्पेशालिटी क्षेत्रांमध्ये कोणतीही मोठी भूमिका बजावू शकत नाहीत.

पारंपारिकपणे, डीएम अभ्यासक्रम हे वैद्यकीय पदव्युत्तरांना सुपर स्पेशालिटी क्षेत्रात प्रशिक्षित करण्यासाठी असतात. पदवीधर पदवी एखाद्या डॉक्टरला सामान्य व्यवसायी म्हणून प्राथमिक काळजीच्या स्तरावर कार्य करण्यासाठी सुसज्ज करते, तर पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यास म्हणजे दुय्यम काळजी देणारे विशेषज्ञ तयार करणे. ड्च्र् सारखे कार्यक्रम, जे सहसा प्रशिक्षणासाठी केवळ तज्ज्ञांची निवड करतात, विशिष्ट उपविशेषतेमध्ये सखोल तज्ज्ञ असलेले डॉक्टर तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवतात. आयुर्वेद हे एक प्राचीन शास्त्र आहे जे पुरावे गोळा करण्याच्या आणि मूल्यमापनाच्या पद्धती नवीन असताना विकसित झाल्या. आरोग्य आणि आजारपणातील जीवन-प्रक्रियांबद्दलची त्याची समज रेखाटलेली आणि अनेकदा अनुमानित होती. तथापि, आरोग्य-संवर्धन आणि आजार-व्यवस्थापनावरील त्याची निरीक्षणे, शतकानुशतके वैद्यांच्या दस्तऐवजीकरण अनुभवांद्वारे प्रबलित, वैधता टिकवून ठेवतात; परंतु ही वैधता सावधांसह येते. सर्वात महत्त्वाची सूचना ही आहे: पारंपारिक वैद्यकीय प्रणालींना केवळ मऊ पुराव्यांचा आधार दिला जातो, उच्च-जोखीम असलेल्या क्लिनिकल परिस्थितींमध्ये त्यांच्या प्रिस्क्रिप्शनचा स्वतंत्र उपचार म्हणून वापर करणे अविवेकी आहे.स्पष्ट करण्यासाठी, प्राथमिक काळजी सेटिंग्जमध्ये सौम्य उदासीनता एक सामान्य सादरीकरण आहे. आयुर्वेद आणि योगाच्या हस्तक्षेपाने हे सुरक्षितपणे आणि प्रभावीपणे हाताळले जाऊ शकते. होलिझमवर आयुर्वेदाचा भर आणि त्याच्या दृष्टीकोनाची सौम्यता, तसेच त्याची सांस्कृतिक स्वीकारार्हता, अशा केसेसच्या त्यांच्या अंतर्गत असलेल्या मनोसामाजिक तणावाच्या संदर्भात व्यवस्थापन करण्यासाठी ते विशेषतः संबंधित बनवते. जर स्थिती सुधारली नाही तर उच्च पातळीच्या काळजीचा संदर्भ देण्याचा पर्याय नेहमीच खुला असतो. परंतु मनोविकाराची लक्षणे आणि आत्महत्येच्या जोखमीसह गंभीर नैराश्यासाठी सहसा मानसोपचारात प्रशिक्षित तज्ज्ञांना त्वरित रेफरल आवश्यक असते. आयुर्वेद आणि योग गंभीर प्रकरणांच्या व्यवस्थापनासाठी पूरक प्रणाली म्हणून वापरणे चांगले आहे; ते पारंपरिक व्यवस्थापनाला पर्याय म्हणून काम करू शकत नाहीत. आणि मोठ्या प्रमाणावर, पारंपारिक वैद्यकीय प्रणाली काळजीपूर्वक सुरक्षा जाळ्यांनंतर आणि वैज्ञानिक विवेकबुद्धीने वापरल्यास प्राथमिक काळजीमध्ये वापरण्यायोग्य आहेत. ऑक्सफर्ड टेक्स्टबुक ऑफ मेडिसिन स्पष्ट करते, जेव्हा ते सिद्ध दर्जाचे, सुरक्षिततेचे आणि परिणामकारकतेचे असते, तेव्हा पारंपारिक औषध सर्व लोकांना त्यांना आवश्यक असलेली काळजी घेण्याची खात्री करण्याच्या उद्देशात योगदान देते. अगदी प्राथमिक काळजीमध्येही, ज्या प्रकरणांना तीव्र व्यवस्थापनाची आवश्यकता असते ते आधुनिक औषधांसाठी सर्वोत्तम सोडले जातात.

आयुर्वेदाची जीवन-प्रक्रियेची रेखाटलेली समज, त्याचे प्राचीन ह्युरिस्टिक्सवर आधारित निदान आणि त्याच्या प्रिस्क्रिप्शनला पाठिंबा देणारे मऊ पुरावे ही वैशिष्ट्ये आहेत जी विशिष्ट क्षेत्रांमध्ये त्याची भूमिका कमी करतात. केवळ आयुर्वेदिक ग्रंथांना वर्तमान विज्ञानाला पूरक करून या त्रुटी दूर होणार नाहीत. सध्याचे विज्ञान प्राचीन ज्ञानाचा अधिक विवेकपूर्ण वापर करण्यात नक्कीच मदत करत असले तरी ते त्याची व्याप्ती कृत्रिमरित्या वाढवू शकत नाहीत. यकृताची कार्ये आणि पॅथॉलॉजीजची केवळ अस्पष्ट समज असलेल्या प्रणालीवर आधारित सुपर स्पेशालिटी डीएम हेपॅटोलॉजी कोर्स करणे हे धोरणकर्त्यांच्या चुकीच्या आवेशाचा परिणाम आहे. त्याचप्रमाणे प्राचीन ग्रंथांवर आधारित डीएम ऑन्कोलॉजी कोर्स सुरू करण्याची योजना चुकीची आहे ज्यात सामान्य पॅथॉलॉजी म्हणून कर्करोगाची दूरची कल्पना नव्हती. आधुनिक वैद्यकशास्त्राच्या शैक्षणिक पदानुक्रमाची केवळ नक्कल करून प्रणालींमधील समानता येत नाही. औषध म्हणजे मिमिक्री नाही. विशेष क्षेत्रांतील संशोधन करण्यायोग्य प्रस्ताव आयुर्वेदिक क्लासिक्समधून निश्चितपणे एकत्रित केले जाऊ शकतात, परंतु संशोधन करण्यायोग्य प्रस्ताव हा एक रोजगार करण्यायोग्य क्लिनिकल मार्गदर्शक तत्त्वे बनत नाही. आयुर्वेदातील संशोधन करण्यायोग्य क्षेत्रांचा शोध घेणे हा आयुर्वेदिक विज्ञानातील केंद्रीय संशोधन परिषदेचा आणि त्याच्या असंख्य प्रादेशिक केंद्रांचा आदेश आहे. कमी-संशोधित क्षेत्रातील सुपर स्पेशालिटी अभ्यासक्रम न्याय्यपणे त्या आदेशाचा वापर करू शकत नाहीत.

अशा हडपाचे दोन अनिष्ट परिणाम होतील. प्रथम, कर्करोगासारख्या गंभीर पॅथॉलॉजीच्या व्यवस्थापनात आयुर्वेदाचा मोठा वाटा आहे असे सुचवून ते लोकांना चुकीची माहिती देईल. या प्रकारची चुकीची माहिती केवळ धूर्त लोक वारंवार करत असलेल्या अतिउत्साही दाव्यांना विश्वास देईल. सुप्रीम कोर्टाने अलीकडेच एका आयुर्वेदिक औषध कंपनीला भ्रामक दाव्यांसाठी फटकारले आहे. दुसरे, आयुर्वेद, ज्याने नेहमीच आपल्या डॉक्टरांनी त्यांच्या दाव्यांमध्ये नम्र आणि सत्यवादी असावे असा आग्रह धरला आहे, तो त्याच्या आवाजातील विकृत व्यक्तींद्वारे आणखी

### व्यंगचित्र




-महादेव साने,कराड जि.सातरा

### सुविचार

जीवन म्हणजे एक प्रवास
आहे, नेहमी शिकत राहा.

### अर्थ वार्ता

## २०२३-२४ मध्ये १.0२ लाख कोटी; ७ महिन्यांत ५0% वाढले गोल्ड लोन
## २०२४-२५ मध्ये ऑक्टोबरपर्यंत १.५४ लाख कोटी कर्ज ,

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत म्हणजेच २०२४-२५ मध्ये गोल्ड लोनमध्ये ५६% वाढ झाली आहे. ठइख ने शुक्रवारी जारी केलेल्या बँक क्रेडिटच्या क्षेत्रीय उपयोजन डेटावरून असे दिसून आले आहे की १८ ऑक्टोबर २०२४ पर्यंत १,५४,२८२ कोटी रुपयांची सुवर्ण कर्जे वितरित केली गेली आहेत.

२०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या ७ महिन्यांत एकूण ९८.८ हजार कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले. गेल्या आर्थिक वर्षात बँका आणि छइत्र्ॠ द्वारे एकूण १,0२,५६२ कोटी रुपयांचे सोने कर्ज वितरित केले गेले. या आर्थिक वर्षाच्या पहिल्या ७ महिन्यांत वितरित केलेल्या कर्जापेक्षा हे ५0% कमी आहे.वैयक्तिक कर्जामध्ये वार्षिक आधारावर ५.६% वाढ झाली आहे. त्याच वेळी, बँकांच्या कर्ज दरात १२.१% वार्षिक वाढ दिसून आली आहे. या आर्थिक वर्षाच्या पहिल्या ७ महिन्यांत क्रेडिट कार्ड कर्जामध्ये ९.२% वाढ होईल.तज्ज्ञांच्या मते, सोन्याच्या कर्जात ही वाढ होण्याचे कारण सोन्याच्या किमतींत झालेली वाढ असू शकते. याशिवाय गोल्ड लोन सहज आणि कमी व्याजावर उपलब्ध आहे. त्याच वेळी, काही विश्लेषक देखील सोन्याच्या कर्जाची वाढती मागणी आर्थिक संकटाचे लक्षण मानतात.गोल्ड लोन घेण्यापूर्वी अनेक पैलूंचा विचार करणे आवश्यक आहे. यामध्ये व्याजदर, कर्ज-ते-मूल्य गुणोत्तर, प्रक्रिया शुल्क आणि कर्ज परतफेडीच्या अटींचा समावेश आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, तुमच्या तारण ठेवलेल्या सोन्याची सुरक्षितता अत्यंत महत्त्वाची आहे. अशा परिस्थितीत, तुम्ही एक प्रतिष्ठित सावकार (म्हणजे सोने कर्ज देणारी फर्म) निवडावा ज्यांच्याकडे सुरक्षित स्टोरेज किंवा लॉकर सुविधा आहे किंवा विमा उतरवलेला तिजोरी आहे.गोल्ड लोन हे सुरक्षित कर्ज आहे. सोने तारण ठेवल्याने सावकाराची आर्थिक जोखीम कमी होते.गोल्ड लोन प्रक्रियेला तुलनेने कमी वेळ लागतो. त्यासाठी फारशी कागदपत्रे लागत नाहीत.

सोन्याच्या किमती जसजशा वाढतात तसतसे तुमचे गुंतवणुकीचे मूल्य वाढू शकते, ज्यामुळे सोने कर्ज घेणे फायदेशीर ठरते.

जर तुम्ही कर्जाची वेळेवर परतफेड करू शकत नसाल तर कर्ज कंपनीला तुमचे सोने विकण्याचा अधिकार आहे. याशिवाय, सोन्याची किंमत कमी झाल्यास, कर्ज देणारा तुम्हाला अतिरिक्त सोने गहाण ठेवण्यास सांगू शकतो. जेव्हा तुम्हाला अल्प कालावधीसाठी पैशांची गरज असते तेव्हाच गोल्ड लोन घेणे योग्य असते. घर खरेदीसारख्या मोठ्या खर्चासाठी त्यांचा वापर न करणे योग्य ठरणार नाही.

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# रोटरी क्लबने बसविले ज्येष्ठ नागरीकांसाठी सिमेंट बाक



सांगोला : रोटरी क्लब सांगोला यांच्यावतीने शिवाजीनगर येथे ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी सिमेंटचे बाक बसवण्यात आले.दररोज संध्याकाळी बरेचसे ज्येष्ठ नागरिक यांना बसण्याची अडचण जाणवली.थोडे फिरून आल्यानंतर ज्येष्ठ नागरिकांना थकल्यासारखे होते त्यावेळी विश्रांतीसाठी हे बाक उपयोगी येतात. त्यांची सोय व्हावी या हेतूने क्लबने हा उपक्रम घेतला. याप्रसंगी सर्व ज्येष्ठ नागरिकांनी क्लबचे आभार व्यक्त केले.

या प्रसंगी पंडित,खंडागळे,चोथे,दीक्षित या आज्ञी व इतर हजर होते. या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष श्री बजरंग केदार आवर्जून उपस्थित होते.

या प्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष रो.इंजि. विकास देशपांडे, सचिव रो.इंजि.विलास बिले, रो.शरणाप्पा हळीसागर, रो.माणिक भोसले, रो.इंजि.हमिद शेख, रो. इंजि.अशोक गोडसे, रो.इंजि.मधुकर कांबळे,रो.अड.विशाल˘ बेले,रो. अरविंद डोंबे गुरुजी व इतर नागरिक उपस्थित होते.

# जिल्ह्यात पशुगणना सुरु; नागरिकांनी गणनेत सहभागी होवून माहिती देण्याचे सहकार्य करावे

सोलापूर : केंद्र शासनाच्या आदेशानुसार पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागामार्फत दर ५ वर्षांनी राज्यातील पशुधनाची गणना करण्यात येते. यानुसार सोलापूर जिल्हयामध्ये दिनांक २५ नोव्हेंबर पासून पशुगणना मोहिमेची सुरवात झाली आहे. पशुगणना २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सुरू राहणार असून, या कालावधीत प्रगणक घरोघरी जाऊन, पशुधनाची माहिती घेणार आहेत. प्रत्येक गावातील व शहरातील प्रगणक नागरिकांशी संवाद साधून माहिती गोळा करणार आहेत. तरी नागरिकांनी या गणनेत सहभागी होऊन योग्य माहिती देवून सहकार्य करावे असे, आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एन.एल.नरळे यांनी केले आहे.

सदर पशुगणनेमध्ये सर्व प्रजातीच्या पशुधन व कुक्कुट पक्षी जाती लिंग व वय निहाय गणना करण्यात येणार आहे. पशुगणना ही संगणकीय प्रणालीवर होणार असल्याने सदरची पशुगणना करणेसाठी प्रगणकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. जिल्हयामध्ये पशुसंवर्धन विभागामार्फत २९२ प्रगणक व ८० पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. शहरी भागाकरीता ४ हजार घरामागे १ प्रगणक व ग्रामीण भागाकरीता ३ हजार घरामागे १ प्रगणक नियुक्ती केलेली आहे. सदर पशुगणनेमध्ये सर्व प्रजातीच्या पशुधन व कुक्कुटादी पक्षी जाती लिंग व वय निहाय गणना करण्यात येणार आहे. सर्व ग्रामपंचायत स्तरावरील सर्व सरपंच, ग्राम पंचायत अधिकारी, सर्व कर्मचारी यांनी गावपातळीवर पशुगणना दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत होणार असल्यामुळे पशुगणना करणाऱ्या प्रगणकांना सहकार्य करावे. जेणे करून गावपातळीवरील सर्व पशुधनाची नोंद पशुगणनेमध्ये होईल. पशुगणनेपासुन कोणतेही पशुधन वंचीत राहणार नाही. पशुगणनेत प्रगणक कुटुंब प्रमुखाचे नाव, त्यांचे शिक्षण, जनावर त्याची प्रजात, वय, लिंग, त्यांचा कोणत्या उद्देशाकरीता पालन केले जाते, त्यापासून मिळणारे उत्पादन आदी विविध माहिती संकलित केली जाणार आहे. कत्तलखाना, दररोज होणाऱ्या जनावर व पक्षीनिहाय कत्तलीची संख्या, गोशाळा, छोटे मोठे नोंदणीकृत व अनोंदणीकृत कुक्कुटपालन संस्था, मांस विक्री केंद्र तेथे रोजची जनावरे, पक्षीनिहाय कत्तल विक्री, मोकाट जनावरे, कुत्रे आदी विविध प्रकारची नोंदणी वेगवेगळ्या पध्दतीने केली जाणार आहे.

या पशुगणनेमधून प्राप्त होणारी माहिती पुढील पाच वर्षाचे नियोजन, धोरणात्मक निर्णय व विविध योजनांकरीता अत्यंत उपयुक्त असल्याने सदर पशुगणना अत्यंत महत्वाची आहे. पशुगणना करणाऱ्या प्रगणकांना सर्वतोपरी सहकार्य करावे आवाहनही मुख्य कार्यकारी अधिकारी कूलदिप जंगम, अति मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिणकर यांनी केले आहे.

# सह्याद्री फार्मसी कॉलेज मेथवडे येथे डी.फार्मसी तृतीय फेरीसाठीचे ऑपशन फॉर्म चालू : डॉ.दिलीपकुमार इंगवले

सांगोला : सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे या २००५ स्थापना असलेल्या महाविद्यालयात डी.फार्मसी, बी.फार्मसी व एम.फार्मसी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

. दर वर्षी डी.फार्मसी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया शासन राबवते.हि प्रवेश प्रक्रियामध्ये विविध टप्यामधून राबवली जाते जसे कि विद्यार्थी नोंदणी व निश्चिती, तात्पुरती यादी, अंतिम यादी, प्रवर्गनिहाय जागा प्रदर्शित करणे,प्रथम फेरीसाठी उमेदवाराने स्वतःच्या लॉगीनमधून कॉलेजचे पसंतीक्रमांक नोंदणे,लागलेल्या पसंतीची स्वीकृती करणे, प्रवेश निश्चिती करणे इत्यादी.शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठीची डी.फार्मसी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया ऑगस्टला चालू झाली होती. परंतु शासनाच्या काही तांत्रिक व इतर कारणामुळे संपूर्ण महाराष्ट्र राज्यात हि विद्यार्थी नोंदणी प्रक्रिया आजपर्यंत लांबली होती.

त्यानंतर प्रवेशसाठीची पहिली फेरीची प्रक्रिया व दुसरी फेरीची प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्यानंतर परत शासनाच्या काही तांत्रिक कारणामुळे हि प्रवेशप्रक्रिया रखडलेली होती.परंतु तिसरी फेरी साठीची प्रवेश प्रक्रिया ३० नोव्हेंबर पासून चालू झाली आहे व त्याचे ऑपशन फॉर्म ३० नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर या दरम्यान भरायचे आहेत. तरी डी.फार्मसी प्रथम वर्ष प्रवेशप्रक्रिया नोंदणीकृत विद्यार्थ्यांनी वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रियेत भाग घ्यावा, असे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ .दिलीपकुमार इंगवले,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहितीसाठी डॉ.ए.एम.तांबोळी (९९७५४०२४६५), डॉ.एम.जी.शिंदे (८३०८४८७२७८) प्रा.सौ.एस.एम.पवार (९९७५९९२८१८) व श्री.पी.एस.लोखंडे (९८२३१०७३७१ ) याना संपर्क

# सांगोला तालुक्यात कृषी विभागाकडून प्रक्षेत्र भेट व चर्चासत्र संपन्न



सांगोला : कृषी विभागाच्यावतीने सांगोला तालुक्यात गुरुवार दि. २८ नोव्हेंबर रोजी प्रक्षेत्र भेट व चर्चासत्र संपन्न झाले.चर्चा सत्रात कृषी विभाग व कृषी शास्त्रज्ञांचा संवाद पार पडला. यासह शेतकऱ्यांच्या अडचणीविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला तालुक्यात जिल्हास्तरीय प्रक्षेत्र भेट व चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

यावेळी अधिकारी/शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा अधीक्षक शुक्राचार्य भोसले, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ.लालासाहेब तांबडे, शास्त्रज्ञ पोखरे सर यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपविभागीय कृषी अधिकारी सर्व तालुका कृषी अधिकारी मंडळ कृषी अधिकारी उपस्थित होते. यावेळी अकोला येथे महेश आसबे, कडलास येथे नारायण वाघमोडे, वाढेगाव येथे शांतिनाथ सावंत, वाटंबरे येथे दत्तात्रय माळी, उदनवाडी येथे हरी सरगर, गौडवाडी येथे नानासो गडदे, किडबिसरी येथे विवेकानंद घेरडे व चोपडी येथे सतीश पाटील आदी शेतकरी बांधवांनी ड्रॅगन फूड व पेरू लागवड, निंबोळी अर्क, शास्त्रशुद्ध पद्धतीने पशुसंवर्धन,पेढा व खवा प्रक्रिया उद्योग, डाळिंब लागवड ड्रीप, डाळिंब बाग, विवेकानंद स्वीट कॉर्न प्रोजेक्ट,बायोगॅस प्रोजेक्ट याविषयी मार्गदर्शन केले.

# फॅबटेक इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांची सोलापूर झोन अंतर्गत महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेसाठी निवड



सांगोला: डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अंतर्गत घेण्यात येणाऱ्या खोखो स्पर्धेसाठी फॅब्टेक टेक्निकल कॅम्पस, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च मधील बिरा मधुकर वगरे , संकेत सुखदेव कारंडे, विश्वास राजाराम कोरे, सचिन खुशाबा कुलाल, मेघराज सुधीर झगळे व स्नेहल संजय गरड यांची सोलापूर झोन अंतर्गत महाविद्यालयीन खो – खो स्पर्धेसाठी निवड झाल्याचे पत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणोरे , (रायगड) सोलापूर विभागाचे सचिव यांनी दिले. हि स्पर्धा ए.जी.पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी,सोरेगाव जिल्हा, सोलापूर येथे घेण्यात येणार आहे.

सोलापूर झोन अंतर्गत महाविद्यालयीन खो – खो स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे चेअरमन श्री. भाऊसाहेब रुपनर, मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. अमित रुपनर, कार्यकारी संचालक श्री दिनेश रुपनर, व्यवस्थापक प्रतिनिधी प्राजक्ता रुपनर, कॅम्पस डायरेक्टर श्री संजय अदाटे, प्राचार्य डॉ.रवींद्र शेंडगे, डीन अँकॅडमीक डॉ. शरद पवार आदींनी यशस्वी खेळाडूंचे आभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना क्रीडा समन्वयक प्रा.सुनीलकुमार बंडगर यांचे मार्गदर्शन लाभले.

# पान नं.१ वरुन...भगवा फडकवण्याचा शहाजीबापू पाटील यांचा निर्धार

पान नं.१ वरुन...

यावेळी सांगोला मतदार संघातील पदाधिकारी दादासाहेब लवटे, दीपक पवार, विजय शिंदे, रमेश बनसोडे, विकास मोहिते, नवनाथ माने, धनाजी कवडे, राजेंद्र खांडेकर, परमेश्वर साळुंखे, खंडू सातपुते, शहाजी घाडगे, दामोदर साठे, सुनील शिंदे, दत्तात्रय नागणे, विजय पाटील, धनाजी चव्हाण, ॲड. महादेव कांबळे, विजय बनसोडे, यांच्यासह आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. चिकमहुद येथील विचारविनीमय बैठकीसाठी हजारोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. सांगोला तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात सर्व अधिकार शिवसेनेचे लोकप्रिय माजी आमदार शहाजीबापू पाटील यांना देण्याबाबत विधानसभाप्रमुख व माजी नगरसेवक प्रा. संजय देशमुख यांनी ठरवासंदर्भात सूचना मांडली. या सूचनेस शिवसेनेचे तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे यांनी अनुमोदन दिले व हा ठराव शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी बहुमताने मंजूर केला. त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भात सर्व अधिकार शहाजी बापू पाटील यांच्याकडे सोपवण्यात आले आहेत.




# डाळिंब पीक नैसर्गिक संकटात असतानाही डाळिंब निर्यातीस शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद



सांगोला : डाळिंब पीक नैसर्गिक संकटात असतानाही डाळिंब निर्यात करण्यासाठी शेतकरी पुढे येत असल्याचे चित्र आहे. यंदा डाळिंब निर्यातीसाठी नोंदणी सुरू झाली आहे. राज्यातील ७ विविध जिल्ह्यातून आजअखेर २१ हजार २१५ डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे.

यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक १३ हजार २५६ यामध्ये सांगोला तालुक्यातील ५ हाजाराहून अधिक शेतकऱ्यांनी अनारनेट वर ऑनलाइन नोंदणी केली आहे.शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेता, या वर्षीही डाळिंबाची निर्यात वाढेल, असा विश्वास अखिल भारतीय डाळिंब संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे यांनी व्यक्त केला आहे. गेल्या तीन वर्षांपासून डाळिंब नैसर्गिक आपत्तीमुळे धोक्यात आले आहे. परिणामी, डाळिंबाच्या उत्पादनातही काही प्रमाणात घट झाली. त्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेत डाळिंबाला अपेक्षित दर मिळत आहे.

अशा परिस्थितीतही सांगोला तालुक्यातील डाळिंब उत्पादक शेतकरी डाळिंबाची निर्यात करण्यासाठी पुढे येत आहेत. गतवर्षी डाळिंबाची निर्यात वाढली आहे. त्यामुळे डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

देशातून सर्वाधिक डाळिंब निर्यात महाराष्ट्रातून होते. राज्यातून प्रामुख्याने युरोपियन देश, सौदी अरेबिया, श्रीलंका, आणि थायलंड यासह बांगलादेश, नेपाळ नेदरलँड या देशात डाळिंबाची निर्यात केली जाते.

यंदा डाळिंबाला पाणीटंचाई, आणि अतिपावसाचा फटका बसला आहे. परिणामी डाळिंबाला पोषक वातावरण नसल्याने सेटिंग होण्यास अडथळे निर्माण झाले होते. त्यातूनही शेतकऱ्यांनी काटेकोर नियोजन करत डाळिंब बागा साधल्या आहेत.यंदा डाळिंब निर्यात करण्यासाठी नोंदणी सुरू झाली आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांनी नोंदणी करू लागले आहेत. आतापर्यंत २१ हजार २१५ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.

सर्वाधिक नोंदणी सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केली,यामध्ये सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांचा अधिक समावेश आहे. तर त्या खालोखाल सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नोंद केली आहे. प्रतिकूल परिस्थितीत डाळिंब उत्पादक शेतकरी निर्यातीसाठी पुढे येत आहेत ही बाब चांगली आहे.त्यामुळेच यंदाही शेतकऱ्यांनी डाळिंब निर्यातीसाठी चांगली नोंदणी केली असून निर्यात वाढेल असा विश्वास अखिल भारतीय डाळिंब संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे यांनी व्यक्त केला आहे.

डाळिंबाचे कोठार म्हणून सांगोल्याची सबंध देशभरात ओळख आहे. सांगोला तालुक्यातील डाळिंब हे जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचले आहे. अनेक संकटाचा सामना करत येथील बळीराजा शेतकऱ्यांनी जिद्द चिकाटी आणि कष्टाच्या जोरावर भयान अशा माळरानावर कमी पाण्यावर चांगल्या प्रकारचे डाळिंब उत्पादन घेतले आहे.

## विकसित भारत यंग लिडरर्स डायलॉग स्पर्धेसाठी नोंदणी करण्याचे आवाहन

सोलापूर : राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन १२ जानेवारी २०२५ दिल्ली येथे होणार आहे. या अनुषंगाने जिल्ह्यातील युवांनी राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी विकसित भारत यंग लिडरर्स डायलॉगसाठी माय भारत पोर्टलवर नोंदणी करून स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा क्रिडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे. भारत निर्माणासाठी नवीन संकल्पना विचारात घेवून युवांना राष्ट्र निर्माण कार्यामध्ये सहभागी करून राष्ट्रीय युवा महोत्सव अंतर्गत विकसित भारत यंग लिडरर्स डायलॉग अंतर्गत विविध संकल्पना निश्चित करण्यात आल्या आहेत. प्रथम टप्प्यात विकसित भारत क्विझमध्ये वैयक्तिकरित्या स्पर्धकांना सहभागी होता येईल. प्रश्न मंजुषा स्पर्धा, सामान्यज्ञान व भारताची कामगिरी या बाबींवर ही स्पर्धा होणार आहे. यासाठी माय भारत पोर्टलवर शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांनी सहभाग नोंदवावा. या स्पर्धा दि. २५ नोव्हेंबर ५ डिसेंबर २०२४ या कालावधीत होणार आहे. व्दितीय टप्प्यात विकसित भारत यावर निबंध लेखन स्पर्धा घेतली जाईल. यामध्ये शब्द मर्यादा १००० शब्दाची राहील, प्रथम टप्प्यात सहभागी होवून निवड झालेल्या युवांचा यामध्ये सहभाग राहील. निबंध स्पर्धा ऑन लाईन पध्दतीने दि. ८ ते १५ डिसेंबर २०२४ या कालावधीत होणार आहे. तृतीय टप्प्यात विकसित भारत पीपीटी चॅलेंजवर निर्धारित विषयांवर राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा घेण्यात येणार आहे. यामध्ये प्रत्येक राज्यातून ४ युवांची निवड करण्यात येणार आहे. दि २० ते २६ डिसेंबर कालावधीत या स्पर्धा होणार आहेत. चतुर्थ टप्प्यात राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झालेल्या युवांना दि. ११ जानेवारी २०२५ रोजी सादरीकरण करावे लागेल. जिल्ह्यातील १५ ते २९ वर्षाआतील युवक व युवतींनी माय भारत पोर्टलवर नोंदणी करून स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

## गळ्यातील तीन तोळ्याची सोन्याची चैन लांबविली

सांगोला : अनोळखी इसमाने गळ्यातील तीन सोन्याची चैन बळजबरीने हिसका मारुन तोडून नेली असल्याची घटना २३ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास सांगोला शहरातील जयभवानी चौक येथे घडली.फिर्याद संजय पवार (रा.अलराईन नगर, मोहर हॉटेल समोर, सांगोला) यांनी सांगोला पोलीस स्टेशनला दिली आहे.

फिर्यादी संजय पवार यांच्या गळ्यातील सोन्याची चैन ही दिनांक २३/११/२०२४ रोजी दुपारी ४ वाचे दरम्यान मौजे सांगोला येथील जय भवानी चौक येथुन अनोळखी इसमाने चोरी करुन घेवुन पळुन गेला असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.दिवसाढवळ्या घडलेल्या या प्रकारामुळे सांगोला शहरात भितीचे वातावरण तयार झाले आहे. पुढील तपास वजाळे हे करीत आहेत.

## सांगोला अर्बन बँककडून आण्णासाहेब पाटील महामंडळ व ओबीसी महामंडळ या योजने अंतर्गत व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध

सांगोला :महाराष्ट्र शासनाने राज्यातील मराठा व इतर मागासवर्गीय यांच्या कल्याण व आर्थिक विकासासाठी विविध व्यवसायिक क्षेत्रातील व्यापार किंवा उद्योग यांची योजना आखणे, त्यांना चालना देणे, सहाय्य करणे, सल्ला देणे, मदत करणे, वित्त पुरवठा करणे, त्यांना व्यापार किंवा उद्योग सुरु करण्यासाठी आवश्यक ती तांत्रिक व व्यवस्थापकीय साधने पुरवून त्यांची आर्थिक स्थिती, उत्पादन निर्माती, व्यवस्थापन आणि पणन यांचा विकास करणे / त्यात सुधारणा करणे यासाठी आणासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, महाराष्ट्र राज्य इतर मागसवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मर्यादित, जगज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ व संत सेनानी महाराज केशशिल्पी महामंडळ या महामंडळ अंतर्गत कर्जाची सोय सांगोला अर्बन बँकेकडून करण्यात आली आहे.

या वरील योजनांचा लाभ सांगोला अर्बन बँकेच्या कार्यक्षेत्रातील सभासदांना लाभदायक असल्याने बँकेने सदर योजना स्विकृत करुन जास्तीत जास्त सभासदांना याचा लाभ देण्याचे ठरविले आहे.

सदर महामंडळामार्फत वितरीत करण्यात येणा–या कर्जावरील व्याजाचा परतावा महामंडळाकडून होणार आहे.

आणासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित या महामंडळामार्फत कर्ज मर्यादा रु.१५.०० लाखापर्यंत असून महाराष्ट्र राज्य इतर मागसवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मर्यादित, जगज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ व संत सेनानी महाराज केशशिल्पी महामंडळ या महामंडळामार्फत कर्ज मर्यादा रु. १०.०० लाखापर्यंत आहे. या सर्व महामंडळाकडून कर्ज घेण्यापूर्वी महामंडळाच्या कार्यालयाकडून एल ओ आय (लेटर ऑफ इंटेन्ट) घेणे आवश्यक आहे. एल ओ आय मिळाल्यानंतर व बँकेच्या अटी व शर्तीची पुर्तता केल्यानंतर कर्ज वितरीत करण्यात येणार असून यासाठी बँकेकडून मार्गदर्शन करण्यात येईल.

तरी या योजनेचा लाभ घ्यावा. असे आवाहन बँकेंचे चेअरमन डॉ. प्रभाकर माळी व बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन सीए के. एस. माळी यांनी केले आहे.

9821569005
9076041977
9890218146
Home Loan
Personal Loan
Education Loan
Vehicle Loan
Mahalaxmi Finance Services.
All types of loan available here

निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा...
साप्ताहिक माणदेश वार्ता